शिनाबाई राजेन्ना बोटेवाड व इतर
विरुध्द
पेदाबाई पोतन्ना जंगीलवाड व इतर

**नियमित दावा क्रमांक १७/२०२३ मधील**
**निशाणी क्र.४२ खालील आदेश**

वादींनी प्रस्तुत अर्जाव्दारे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे.

**०२.** वादींचे असे कथन आहे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा वडीलोपार्जित मिळकतींचे वाटप करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादींकडून दावा दाखल करताना अनावधानाने दावा मिळकतीच्या चर्तुःसिमा नमूद करण्याच्या राहून गेल्या आहेत. सबब, वादींनी वादपत्रात दावा मिळकतीच्या चर्तुःसिमा प्रस्तावीत दुरुस्तीद्वारे नमूद करण्याची विनंती केलेली आहे.

**०३.** त्याउलट, प्रतिवादींनी नि.क्र.४६ अन्वये प्रस्तुत अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांचे असे कथन आहे की, दावा दाखल करताना वादींनी काळजी घेणे गरजेचे होते. परंतु वादींनी जाणीवपूर्वक दावा मिळकतीच्या चर्तुःसिमा दाव्यात नमूद केलेल्या नाहीत. त्याचप्रमाणे त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, दावा वाटपासाठी असल्यामुळे त्याच्या चर्तुःसिमा नमूद करण्याची आवश्यकता नाही. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**०४.** उभय पक्षकारांतर्फे विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा दावा, दावा मिळकतींचे वाटप करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादींनी दावा मिळकतीच्या चर्तुःसिमा वादपत्रात नमूद केलेल्या नसल्याचे अभिलेखावरुन दिसते. दाव्यात अद्याप पक्षकारांचा पुरावा सुरु झालेला नाही.

त्यामुळे प्रस्तुत दुरुस्तीस दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील परंतुकाची बाधा येत नाही. प्रस्तावीत दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. महत्वाची बाब म्हणजे वाद मिळकतीच्या चर्तुःसिमा वादपत्रात नमूद करण्याची परवानगी दिल्यास मिळकतीचे परिपुर्ण वर्णन अभिलेखावर येणार आहे. त्यामुळे दाव्यातील वादप्रश्नांचा निर्णय करण्यास मदत होणार आहे.

**०५.** प्रस्तावीत दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नूकसान होणार नाही. अशा परिस्थितीत प्रस्तावीत दुरुस्ती मंजूर करणे न्यायोचीत आहे. वादी दावा दाखल करतेवेळी दावा मिळकतीच्या चर्तुःसिमा वादपत्रात नमूद करु शकत होते. परंतु त्यांनी चर्तुःसिमा दावा दाखल करताना नमूद न करुन पुरेशी काळजी घेतलेली नाही हे अभिलेखावरुन दिसते. त्यामुळे अर्जाचा खर्च वादींवर ठेवून त्याद्वारे प्रतिवादींना नूकसान भरपाई देणे उचित होईल. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :–<u>आदेश</u>–:

**०१)** अर्ज (नि.क्र.४२) रक्कम रुपये ३००/–च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो, खर्चाची रक्कम प्रतिवादींना देण्यात यावी.

**०२)** वादींनी अर्जात सुचविलेली दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करुन त्या अनुषंगाने दुरुस्त दाव्याच्या प्रती न्यायालयात सादर कराव्यात.

(**खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला**)

PRADIP MADAN MANE Digitally signed by PRADIP MADAN MANE Date: 2025.01.29 18:02:41 +0530

दिनांकः २९/०१/२०२५ **(पी.एम.माने)**

किनवट. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर

किनवट.

## Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.M.Chitmalwar |
| Court Name | : | Court of C.J.J.D., Kinwat |
| Date | : | 29/01/2025 |
| Order signed by | | |
| the Presiding Officer on | : | 29/01/2025 |
| Order uploaded on | : | 29/01/2025 |